# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१ Website : https//:barti.maharashtra.gov.in

## बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी लिपीकवर्गीय व तत्सम पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारी करिता अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी इत्यादी लिपीक वर्गीय व तत्सम पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारी करिता नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) खालील नमूद केलेल्या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. इच्छूक व पात्र उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील संस्थेशी संपर्क साधून त्या संस्थेकडे अर्ज करावा.

पात्र युवक-युवतींना https://barti.maharashtra.gov.in या वेब साईटवरून 'Notice Board च्या सदराखाली **बँक, रेल्वे, एल.आय.सी.** लिंकवरून अर्ज डाऊन लोड करून किंवा खालील नमुद संस्थेच्या कार्यालयातून प्राप्त करून, खालील पैकी ज्याठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्या ठिकाणी असलेली खालील नमूद संस्थांकडे **दि. १२/११/२०१८** पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागद पत्रांसह सादर करावा.

| अ.क्र. | जिल्हा | प्रशिक्षण संस्थेचे नांव / पत्ता / दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| 1 | लातुर | यशवंतराव चव्हाण समाज विकास प्रतिष्ठाण, संवाद सरस्वती शाळेच्या पूर्वेस, प्रकाश नगर, लातुर मोबाईल क्र. 9422072103 / 02382-224020 |
| 2 | सोलापूर | सेंटर फॉर रिसर्च एज्युकेशन डेव्हलपमेंट ॲण्डइंडस्ट्रियलट्रेनिंग, A-1 मंगल कॉम्पलॅक्स, होडगी रोड, आसरा चौक, सोलापूर. मोबाईल क्र. 9850211005 / 8087549282 / 0217-2607596 |

उपरोक्त नमूद प्रशिक्षण केंद्रामध्ये अनुसूचित जातीच्या ५० विद्यार्थ्यांची एक बॅच याप्रमाणे निवड केली जाईल. व १० विद्यार्थ्यांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी व ३ टक्के जागा **"दिव्यांग" असलेल्या व्यक्ती (Person with Disability)** यांच्यासाठी राखीव राहतील.

**पात्रता :** १) महाराष्ट्र राज्याचा अनुसूचितजाती मधील उमेदवार असावा. २)अर्जदाराचे वय १८ ते ३५ पर्यन्त असावे. ३)अर्जदार किमान १२ वी उतीर्ण असावा.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :** १) वर नमुद प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १२/११/२०१८ २) प्रशिक्षण कालावधी ४ महिन्यांचा राहील. ३) विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची चाळणी परीक्षा (screening test) वर नमुद संस्थेमार्फत दिनांक १५/११/२०१८ रोजी घेण्यात येऊन उमेदवारांची गुणानुक्रमे कोंचिगसाठी निवड करण्यात येईल. ४) प्रशिक्षण कोंचिग क्लास दिनांक २०/११/२०१८, च्या दरम्यान सुरु करण्यात येईल. ५) निवड झालेल्यापैंकी पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान रोज ३ तास व त्यापेक्षा जास्त तसेच एकूण दरमहा ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहील त्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ३०००/- विद्यावेतन व ३०००/- एवढ्या किंमतीचे नि: शुल्क वाचन साहित्य व पुस्तकांचा संच येईल. ६) सदर प्रशिक्षण (Coaching)कार्यक्रम उपरोक्त २ जिल्ह्यांमध्ये २ प्रशिक्षण केंद्रामार्फत राबविण्यात येणारअसून, त्याबाबत संबंधित जिल्ह्यातील वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी वर नमूद जिल्ह्यामध्ये कोंचिग घेण्यासाठी इच्छुक उमेदवार त्या जिल्ह्यातील जाहिरातीनुसार अर्ज करु शकतील. ७) विहीत नमुन्यातील अर्ज वर नमुद केलेल्या संस्थेच्या कार्यालयाकडून किंवा बार्टी, पुणे यासंस्थेच्या वेबसाईटवरुन प्राप्त करुन भरता येईल. अधिक माहितीसाठी वर नमुद प्रशिक्षणसंस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. ८) ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत स्पर्धा परिक्षेचे प्रशिक्षण (कोंचिग) घेतले असेल, त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी गुणाक्रमे निवड झाली असली. तरी अशा उमेदवारांना विद्यावेतन व पुस्तक संच इत्यादीचा लाभ मिळणार नाही.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :** १) उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो. २) जातीच्या प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत. ३)१२ वी किंवा कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण केलेल्या प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती.

**कैलास कणसे** (भापोसे)
**महासंचालक,बार्टी**

Advt/IBPS/26/10/2018/34